मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# ‘हक्काचा माणूस’ संसदेत पाठवा : बारणे

## थेरगावच्या ‘होम पिच’वर बारणे यांची प्रचाराची जोरदार ‘बॅटिंग’!

**पिंपरी | प्रतिनिधी**

गेली अनेक वर्ष राजकारणात असूनही आपण कधीही सत्ता डोक्यात जाऊ दिली नाही. थेरगाव परिसराचा कायापालट करणारा व नागरिकांच्या अडीअडचणींना धावून येणारा आपला हक्काचा माणूस पुन्हा एकदा संसदेत पाठवा, असे भावनिक आवाहन मावळ लोकसभा मतदारसंघातील शिवसेना- भाजप- राष्ट्रवादी- मनसे- आरपीआय- रासप- मित्रपक्ष महायुतीचे उमेदवार खासदार श्रीरंग बारणे यांनी केले.



मावळ लोकसभा मतदारसंघातील प्रचाराच्या पहिल्या फेरीची सांगता बारणे यांनी थेरगाव या स्वतःच्या गावात केली. प्रमुख पदाधिकारी व मान्यवरांच्या निवासस्थानी जाऊन भेटीगाठी घेण्याबरोबरच ठिकठिकाणी कोपरा सभा घेऊन खासदार बारणे यांनी मतदारांशी संवाद साधला.

थेरगाव गणेशनगरमध्ये पुष्पवृष्टी करून तसेच फटाके वाजवून खासदार बारणे यांचे स्वागत करण्यात आले. शिव कॉलनीमध्ये झालेल्या कोपरा सभेस माजी विरोधी पक्षनेते संतोष बारणे, माजी नगरसेविका माया बारणे यांच्यासह सोपान चौधरी, विलास जगदाळे, लहू नवले, विजय शिंगटे, राजेंद्र शिंदे यांच्यासह परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

बारणे म्हणाले की, देश कोणाच्या हातात द्यायचा, हे ठरवणारी ही महत्त्वाची निवडणूक आहे. नरेंद्र मोदी यांच्या सक्षम नेतृत्वाखाली देश सुरक्षित असून झपाट्याने विकास करीत आहे. केंद्राच्या माध्यमातून महापालिकेला 4000 कोटींपेक्षा अधिक निधी मिळालेला आहे. त्यातून वॉर्ड-वॉर्डमध्ये सिमेंट काँक्रीटच्या रस्त्यांसह विविध विकासकामे झाली आहेत. थेरगावने मला नेहमीच सहकार्य केले आहे. आपल्या हक्काच्या माणसाला यावेळी शंभर टक्के मतदान झाले पाहिजे.

कानिफनाथ गुजर यांच्या निवासस्थानासमोर झालेल्या कोपरासभेला भानुदास गुजर, रोहिदास साधू, वसंत गुजर, विठ्ठल गुजर, दीपक गुजर, निखिल गुजर, सुदाम गुजर, नितीन गुजर, प्रकाश गुजर, शाम गुजर, नारायण बारणे, राजेंद्र भोंडवे, नाना पारखी, पोपटराव भेगडे, प्रल्हाद गुजर, अजिंक्य गुजर, अमित गुजर, स्वप्नील गुजर, लालासाहेब गुजर, विक्रम गुजर, सार्थक गुजर, प्रतीक गुजर, गणेश गुजर यांच्यासह परिसरातील मतदार मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### पाऊस व अंधारातही प्रचार जोरात..

» संध्याकाळी आलेला अवकाळी पाऊस आणि त्यानंतर खंडित झालेला वीजपुरवठा अशा अनेक अडचणींवर मात करत बारणे यांनी मतदारांशी संपर्क साधला. गोविंद बारणे, अभिषेक बारणे, सुरेश बारणे, सागर भरणे, काशिनाथ बारणे, रमेश बारणे, माऊली बारणे, विजय बारणे, अबूतात्या बारणे, शिवाजी आबा बारणे, करिष्मा सनी बारणे, रामदास बारणे, रमेश बारणे, महेश सुदाम बारणे, विजय बारणे, मारुती पवार, गोरख पवार, अनिल पवार, दिलीप पवार, विश्वनाथ पवार, महेश नंदू बारणे, यांना कैलास बारणे, प्रवीण बारणे, ॲड. दिनकर ज्ञानेश्वर बारणे, श्याम नाना बारणे, नाना बारणे, सचिन पवार, तानाजी बारणे, नवनाथ जाधव, गौरव जाधव आदींच्या निवासस्थानी भेट देऊन बारणे यांनी सहकार्याची विनंती केले. फटाके वाजवून, औक्षण करीत सर्वांनी बारणे यांना विजयासाठी शुभेच्छा दिल्या.

---

# चिंचवडमध्ये वाघेरे पाटील यांच्या पदयात्रेला उस्फूर्त प्रतिसाद

## नागरिक, ज्येष्ठ नागरिक, युवकांनी, तसेच महिला भगिनींनी औक्षण करून केले स्वागत

**पिंपरी | प्रतिनिधी**

मावळ लोकसभा मतदारसंघाचे शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे अधिकृत उमेदवार संजोग वाघेरे पाटील यांनी शनिवारी चिंचवड परिसरात पदयात्रा काढून प्रचार केला. ठिकठिकाणी नागरिक, ज्येष्ठ नागरिक, युवकांनी, तसेच महिला भगिनींनी औक्षण करून स्वागत केले. संजोग वाघेरे पाटील यांनी संवाद साधत आपल्याला मतदान करण्याचे आवाहन केले.

चिंचवडगावातील दर्शन नगरी, चित्तराव, गणपती मंदिर, प्रभात कॉलनी, मोरया गोसावी, राज पार्क, गोयल गरिमा, सोनेगिरा टाऊनशिप, काकडे पार्क, विवेक वसाहत, साईबाबा मंदिर, निंबाळकर आळी, भोईर आळी, तालेरा हॉस्पिटल परिसर, शिवाजी उदय मंडळ, लोंढे नगर व भीम नगर परिसरातून कार्यकर्त्यांसह मोठ्या संखेने पदयात्रा काढून शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे उमेदवार संजोग वाघेरे पाटील यांनी मतदारांशी संवाद साधला.



यावेळी माजी नगरसेवक अनंत को-हाळे, ज्योतीताई निंबाळकर, शिवसेना शहर संघटिका अनिताताई तुतारे, उपजिल्हा समितीच्या वैशालीताई मराठे, कविता कोंढे देशमुख, राहुल भोईर, सागर चिंचवडे, निखील भोईर, सागर वाघेरे, विशाल जाधव, कॉंग्रेसचे संदीप शिंदे, झेवियर अंथनी, शेखर लोणकर, सुधाकर कुंभार, समन्वयक उषा अल्हाट, श्रीमंत गिरी, देवराम गावडे, राजू बुचडे, विशाल काळे, सचिन चिंचवडे, रेखा मोरे, प्रवीण शिंदे, आम आदमी पक्षाचे संघटक सचिन पवार, भ्रमानंद जाधव, राहुल वाघमारे, मीनाताई जावळे, संग्रामिनी जावळे, प्रकाश हगवणे यांच्यासह सर्व पक्षाचे पदाधिकारी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### मतदारांना आवाहन

» माजी नगरसेवक अनंत को-हाळे, संतोष माचुतरे आणि कांताताई मुंडे, निलेश डोके यांचे निवासस्थानी भेट घेत चर्चा केली. पदयात्रेतून मतदारांना मशाल चिन्ह लक्षात ठेवा आणि या निवडणुकीत मावळ लोकसभेत शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे शिलेदार संजोग वाघेरे पाटील प्रचंड माताधीधक्याने विजयी करा, असे आवाहन पदाधिकारी, कार्यकर्त्यांनी मतदारांना केले.

# मावळ, शिरूरमध्ये तिरंगी लढत

## माधवी जोशी,आफताब अन्वर मकबूल शेख यांना उमेदवारी जाहीर

**पुणे | प्रतिनिधी**

वंचित बहुजन आघाडीने मावळमधून माधवी जोशी यांना तर शिरूरमधून आफताब अन्वर मकबूल शेख यांना शनिवारी (२० एप्रिल) उमेदवारी जाहीर केली आहे.

मावळ आणि शिरूर लोकसभा मतदारसंघात तिरंगी लढत होणार असल्याचे स्पष्ट झाले आहे. वंचित बहुजन आघाडीने मावळमधून माधवी जोशी यांना तर शिरूरमधून आफताब अन्वर मकबूल शेख यांना उमेदवारी जाहीर केली आहे. मावळ, शिरूर लोकसभा मतदारसंघाठी गुरुवारपासून उमेदवारी अर्ज भरण्यास प्रारंभ झाला आहे. परंतु, वंचितने अद्याप उमेदवार जाहीर केला नव्हता. कर्जत येथील माधवी जोशी या शरद पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसकडून निवडणूक लढविण्यासाठी इच्छुक होत्या. परंतु, महाविकास आघाडीत मावळची जागा ठाकरे गटाला सुटली. त्यामुळे जोशी यांनी शनिवारी वंचितमध्ये प्रवेश करत उमेदवारी मिळविली. महायुतीकडून खासदार श्रीरंग बारणे, महाविकास आघाडीकडून माजी महापौर संजोग वाघेरे आणि वंचितच्या माधवी जोशी यांच्या उमेदवारीमुळे तिरंगी लढत होणार आहे.

शिरूर लोकसभा मतदारसंघातून वंचित बहुजन आघाडीने पुणे जिल्हा परिषदेचे माजी बांधकाम सभापती मंगलदास बांदल यांना उमेदवारी जाहीर केली होती. परंतु, उमेदवारी जाहीर झाल्यानंतर भाजप नेते, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेणे आणि बारामतीत पक्ष विरोधी भूमिका घेतल्याने बांदल यांची उमेदवारी रद्द करण्यात आली होती. आता आफताब अन्वर मकबूल शेख यांना वंचित बहुजन आघाडीने उमेदवारी जाहीर केली आहे. त्यामुळे शिरूरमध्ये राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे उमेदवार खासदार डॉ. अमोल कोल्हे, राष्ट्रवादी काँग्रेसचे शिवाजीराव आढळराव-पाटील आणि वंचितच्या शेख यांच्यात तिरंगी लढत होईल.

वंचित बहुजन आघाडीने मावळ लोकसभा मतदारसंघातून माधवी जोशी यांना उमेदवारी जाहीर केली आहे. तर शिरूरमधून आफताब अन्वर मकबूल शेख यांना उमेदवारी जाहीर केली आहे. त्यामुळे या दोन्ही मतदारसंघात आता तिरंगी लढती होणार आहेत. या दोन्ही मतदारसंघासाठी गुरुवारपासून उमेदवारी अर्ज भरण्यास सुरूवात झाली आहे.

कर्जत येथील माधवी जोशी या राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाकडून निवडणूक लढवण्यास इच्छुक होत्या. मात्र, त्यांना तिकिट मिळाले नाही. महाविकास आघाडीत मावळची जागा ठाकरे गटाला गेल्याने जोशी यांनी वंचितमध्ये प्रवेश केला. यानंतर त्यांना उमेदवारी जाहीर करण्यात आली.

आता मावळमध्ये महायुतीचे श्रीरंग बारणे, महाविकास आघाडीचे संजोग वाघेरे आणि वंचितच्या माधवी जोशी यांच्यात तिरंगी लढत होईल.

पुणे जिल्हा परिषदेचे माजी बांधकाम सभापती मंगलदास बांदल यांना उमेदवारी जाहीर केली होती. परंतु, नंतर ते देवेंद्र फडणवीस यांच्या भेटीला गेल्याने आणि अजित पवारांच्या संपर्कात गेल्याने त्यांची उमेदवारी रद्द केली होती.

वंचितने आता शिरूरमधून आफताब अन्वर मकबूल शेख यांना उमेदवारी जाहीर केली आहेआता शिरूरमध्ये राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अमोल कोल्हे,अजित पवार गटाचेआणि वंचितचे आफताब अन्वर मकबूल शेख यांच्यात तिरंगी लढत होणार आहे.



### वंचितच्या उमेदवारांची कोणाशी लढत ?

» मावळमध्ये एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेने श्रीरंग बारणे यांना उमेदवारी जाहीर केली आहे. तर बारणेविरोधात ठाकरे गटाने संजोग वाघेरे यांना मैदानात उतरवलं आहे. त्यामुळे वंचितच्या उमेदवार माधवी जोशी यांची लढत बारणे आणि वाघेरे या दोघांशीही असणार आहे. तर शिरूरमध्ये अजित पवारांची राष्ट्रवादी आणि शरद पवारांची राष्ट्रवादी आमने-सामने असणार आहे. दरम्यान वंचितने उमेदवार घोषित केल्याने आता शिरूरमध्ये तिरंगी लढत होणार असल्याचे चित्र आहे. वंचितचे उमेदवार आफताब शेख यांची लढत अमोल कोल्हे आणि शिवाजी आढळराव पाटील यांच्याशी होणार आहे.

# ऑपरेशन 'ससून'! थेट आयुक्तांनी हाती घेतली सूत्रे

## घडलेल्या गैरप्रकारांमुळे अधिष्ठात्यांना डावलत थेट वैद्यकीय आयुक्तांनी नियुक्ती

**पुणे | प्रतिनिधी**

ससूनमध्ये मागील काही काळात घडलेल्या गैरप्रकारांमुळे अधिष्ठात्यांना डावलत थेट वैद्यकीय आयुक्तांनी नियुक्तीचा हा आदेश काढला आहे.

ससून सर्वोपचार रुग्णालयात वर्षभरात पाचवा वैद्यकीय अधीक्षक नेमण्याची वेळ आली आहे. विद्यमान अधीक्षक डॉ. अजय तावरे यांना तडकाफडकी या पदावरून दूर करण्यात आले आहे. सुमारे वर्षभरापूर्वी याच पदावरून हटविलेल्या डॉ. यल्लाप्पा जाधव यांच्याकडे पुन्हा पदभार देण्यात आला आहे. विशेष म्हणजे, ससूनमध्ये मागील काही काळात घडलेल्या गैरप्रकारांमुळे अधिष्ठात्यांना डावलत थेट वैद्यकीय आयुक्तांनी नियुक्तीचा हा आदेश काढला आहे.

गेल्या वर्षी मे महिन्यात डॉ. यल्लाप्पा जाधव यांची ससूनच्या वैद्यकीय अधीक्षकपदी नियुक्ती करण्यात आली. त्यानंतर तीन महिन्यांनी ऑगस्टमध्ये त्यांना हटवून डॉ. सुनील भामरे यांच्यावर ही जबाबदारी सोपविण्यात आली. त्यानंतर डॉ. भामरे यांच्या जागी महिनाभरात सप्टेंबरमध्ये डॉ. किरणकुमार जाधव यांची नियुक्ती करण्यात आली. या तिन्ही नियुक्त्या तत्कालीन अधिष्ठाता डॉ. संजीव ठाकूर यांनी केल्या होत्या. याबाबतचे आदेशही त्यांनी काढले होते. नंतर डॉ. ठाकूर यांना ललित पाटील प्रकरणात पदमुक्त करण्यात आल्यानंतर डॉ. विनायक काळे यांच्याकडे अधिष्ठातापद सोपविण्यात आले.

डॉ. काळे यांनी नोव्हेंबरमध्ये पदभार स्वीकारल्यानंतर महिनाभरातच डिसेंबरमध्ये त्यांनी अधीक्षक बदलण्याचे पाऊल उचलले. त्यांनी डॉ. किरणुकमार जाधव यांना हटवून त्यांच्या जागी डॉ. अजय तावरे यांची नियुक्ती केली. याबाबतचा आदेश डॉ. काळे यांनी काढला होता. आता मात्र थेट वैद्यकीय शिक्षण आयुक्त डॉ. राजीव निवतकर यांनी डॉ. यल्लापा जाधव यांच्या नियुक्तीचा आदेश काढला आहे. त्यामुळे अधिष्ठात्यांना डावलण्यात आल्याचे स्पष्ट झाले आहे.



### अनेक वरिष्ठांवर कारवाईची टांगती तलवार

» ससून रुग्णालयात मागील काही काळात घडलेल्या गैरप्रकारांची गंभीर दखल वरिष्ठ पातळीवर घेण्यात आली आहे. त्यामुळे आयुक्तांनी अधिष्ठात्यांना नवीन वैद्यकीय अधीक्षकाची नियुक्ती करण्यास न सांगता थेट नियुक्तीचे आदेश काढला आहे. ससूनमधील अनेक चौकशा प्रलंबित असून, याप्रकरणी अनेक वरिष्ठ अधिकाऱ्यांविरोधात कारवाईची शिफारसही वैद्यकीय शिक्षण संचालनालयाकडून राज्य सरकारला करण्यात आली आहे. यामुळे ससूनमधील अनेक वरिष्ठ अधिकाऱ्यांवर कारवाईची टांगती तलवार आहे, अशी माहिती सूत्रांनी दिली.

# उकाड्यानंतर शहर-उपनगरांत जोरदार सरी

## विजा, वादळी वारा : उपनगरांना झोडपले, काही परिसर जलमय

**पिंपरी | प्रतिनिधी**

विजांचा कडकडाट, ढगांचा गडगडाट आणि वादळी वाऱ्यासह पुण्यात सायंकाळी पावसाने जोरदार हजेरी लावली. शहराच्या मध्यवर्ती भागासह सिंहगड रोड, कात्रज, कोथरूड, वारजे, पाषाण भागात पडलेल्या पावसाने रस्ते जलमय झाले. त्यामुळे पुणेकरांची धांदल उडाली. लवळे येथे सर्वाधिक 18, तर एनडीए परिसरात 9 मिमी पावसाची नोंद झाली.

शनिवारी (दि. 20) सकाळपासून ऊन आणि ढगाळ वातावरण होते. सायंकाळी चार वाजल्यापासून कात्रज, धनकवडी, सिंहगडरोड भागांत ढग दाटून आले. त्यानंतर अवघ्या काही मिनिटांतच मेघगर्जना आणि वादळी वाऱ्यासह पावसाला सुरवात झाली. शिवाजीनगर परिसरातील बहुतांश भाग, सिंहगड रोड, धनकवडी, आंबेगाव, कात्रज, नऱ्हे, धायरी, नांदेड सिटी, वारजे, कर्वेनगर, कोथरूड, चांदणी चौक, एनडीए, बावधन, पाषाण, सुस, औंध या भागात मेघगर्जनेसह पाऊस झाला.



दरम्यान, दोन दिवसांपूर्वी शहराच्या पूर्व भागात जोरदार पाऊस झाला. तर आज शहराच्या पश्चिम भागात जोरदार पावसाच्या सरी कोसळल्या. दरम्यान, काही मिनिटे झालेल्या पावसामुळे उकाड्यापासून दिलासा मिळाला. हवेत गारवाही पसरला. सायंकाळी अचानक सुरू झालेल्या जोरदार पावसामुळे रस्त्यावर ठिकठिकाणी पाणी साचले होते. त्यामुळे वाहनचालकांना पाण्यातून वाहने घेऊन जाताना तारेवरची कसरत करावी लागली. तसेच सिंहगड रस्ता, वारजे, पौड रोड, कर्वे रोड, कात्रज या भागात वाहतुक कोंडी झाली होती.

कात्रज, धनकवडी परिसरात पावसाने वाऱ्यासह हजेरी लावली. दुपारनंतर हळूहळू ढग जमा झाले व संध्याकाळी सुरू झालेल्या पावसाने नागरिकांची तारांबळ उडाली. आंबेगाव पठार, सुखसागर नगर, दत्तनगर, आंबेगाव बु, भारती विद्यापीठ, संतोष नगर, गोकुळ नगर, जांभूळवाडी, कोळेवाडी, भिलारेवाडी, गुजर निंबाळकरवाडी यासह अनेक भागांमध्ये पावसाच्या हलक्या सरी कोसळल्या.

सुमारे अर्धा ते पाऊण तास पाऊस पडला. ०४:३० वाजल्यानंतर हळूहळू ढग दाटून येऊन विजांच्या कडकडाटासह पावसाच्या सरी कोसळल्या, अनेक ठिकाणी रस्त्याच्या बाजूला पाणी साचले होते. संध्याकाळी ०५:३०च्या सुमारास अंधार पडल्यासारखे वातावरण झाले.

यंदाच्या हंगामात झालेला अवकाळी पाऊस, पिकास झालेली थ्रीप्स रोगाची लागण व हमीभावाअभावी तालुक्यातील आंबा बागायतदार शेतकऱ्यांच्या अडचणी वाढल्या आहेत. त्यांच्या वार्षिक उत्पन्नावर याचा फार मोठा परिणाम होण्याची शक्यता आहे. उन्हामुळे त्रस्त झालेल्या नागरिकांना काहीअंशी का होईना उष्णतेपासून दिलासा मिळाला. तापलेल्या उन्हाने उष्णतेचे सर्व विक्रम मागे टाकत सर्वाधिक तापमानाची नोंद केली असताना सायंकाळच्या सुमारास वातावरणात ढग दाटून येऊन अचानक बदल झाले.

शहरात पावसाच्या सरी पडत असून ढगांच्या गडगडाटासह उपनगरात पावसाला सुरुवात झाली आहे. गेल्या दोन दिवसापासून उकाडा जाणवत होता. दरम्यान पावसाच्या सरी आल्याने पुणेकरांना उकाड्यापासून काहीसा दिलासा मिळणार आहे. बाणेर-बालेवाडी येथे देखील वादळी वाऱ्यासह जोरदार पावसाला सुरुवात झाली आहे. यासबोतच सिंहगड रस्ता घोरपडी परिसरात देखील रिमझिम पाऊस सुरू आहे.

### रस्ता निसरडा झाल्याने दुचाकी घसरल्या

**» पावसाने उघडीप दिल्यानंतर रस्ता निसरडा झाल्याने कात्रज डेअरी येथील रस्त्यावर अनेक दुचाकीस्वार घसरून पडले. येथील उतार कमी केला गेल्याचा दावा मनपा प्रशासन करीत असले तरी रंबलर नसल्याने पाण्यामुळे दुचाकी घसरत होत्या. अवकाळी पावसामुळे संध्याकाळी गारवा निर्माण झाला, त्यामुळे उकाड्याने हैराण झालेल्या नागरिकांना सुखद अनुभव मिळाला. रात्री उशिरापर्यंत विजांच्या कडकडांचा आवाज येत होता.**

# पदवीनंतर पीएच.डी.ला मिळणार थेट प्रवेश!

## ज्या विषयात पदवी मिळवली , त्या विषयात पीएच.डी करता येणार

**पिंपरी | प्रतिनिधी**

विद्यापीठ अनुदान आयोग राष्ट्रीय पात्रता परीक्षेमध्ये (युजीसी नेट) एक मोठा बदल करण्यात आला आहे. त्यानुसार चार वर्षे, आठ सत्रांच्या पदवी अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांना ही परीक्षा देता येणार आहे. विद्यार्थ्याने ज्या विषयात पदवी मिळवली असेल, त्या विषयात पीएच.डी. करता येणार आहे.

यूजीसीचे अध्यक्ष प्रा. एम. जगदेशकुमार यांनी एक्स या समाजमाध्यमाद्वारे ही माहिती दिली. सहायक प्राध्यापक पदासाठी, कनिष्ठ संशोधन पाठ्यवृत्तीसाठी युजीसी-नेट ही परीक्षा राष्ट्रीय परीक्षा प्राधिकरणामार्फत (एनटीए)




वर्षातून दोनवेळा घेतली जाते. डिसेंबर आणि जून अशा सत्रांत ही परीक्षा होते. निर्णयानुसार पीएच. डी.साठी नेट परीक्षेतून प्रवेश दिला जाणार आहे. त्यामुळे विद्यापीठांतर्फे घेतल्या जाणाऱ्या पीएच.डी. प्रवेश परीक्षेची आवश्यकता संपुष्टात आली आहे.

युजीसी-नेट परीक्षेची नोंदणी प्रक्रिया सुरू केली जाणार असल्याच्या पार्श्वभूमीवर प्रा. एम. जगदेशकुमार यांनी बदलाची माहिती दिली. या पूर्वीच्या नियमानुसार युजीसी नेट परीक्षा देण्यासाठी उमेदवार पदव्युत्तर पदवीधारक असणे आवश्यक होते. तसेच पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाला असलेल्या विषयात उमेदवारांना पीएच.डी. करता येत होती. प्रा. जगदेशकुमार यांनी दिलेल्या माहितीनुसार, चार वर्षांचा पदवी अभ्यासक्रमाच्या शेवटतील उमेदवारांना नेट परीक्षा देता येणार आहे. चार वर्षांच्या पदवी अभ्यासक्रमातील कोणत्याही शाखेच्या उमेदवारांना त्यांना ज्या विषयात पीएच.डी. करायची आहे त्यासाठी परीक्षा देण्याची परवानगी देण्यात आली आहे. जून २०२४च्या सत्रापासून या निर्णयाची अंमलबजावणी केली जाणार आहे.

### पदवी अभ्यासक्रमाचे महाविद्यालयांना स्वातंत्र्य

**» तसेच चौथ्या वर्षात विद्यापीठ दोन पर्याय विद्यार्थ्यांसमोर ठेवेल. ज्यामध्ये सर्वसामान्य आणि दुसरे संशोधनावर आधारित असणार आहे. जे विद्यार्थी चौथे वर्ष संशोधनावर आधारित निवडतील, त्यांना पदवीनंतर थेट पीएच. डी. ला प्रवेश मिळू शकेल, परंतु त्यासाठी पदवीच्या शेवटच्या वर्षात 7.5 पेक्षा अधिक ग्रेड मिळणे अपेक्षित आहे. विशेष म्हणजे चार वर्षे कालावधीचा पदवी अभ्यासक्रम राबविण्याचे स्वातंत्र्य महाविद्यालयांना असणार आहे.**

# आजी- माजी खासदारांची लढत लक्षवेधी

## शिरूरचा आखाडा चांगलाच तापला : काटा लढतीत सरशी कोणाची?

**पुणे | प्रतिनिधी**

शिरूरचे मैदान चांगलेच तापले असून राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष शरद पवार गटाचे उमेदवार डॉ. अमोल कोल्हे यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला असून दोन दिवसांत राष्ट्रवादी कॉंग्रेसपेक्षा अजित पवार गटाचे उमेदवार शिवाजीराव आढळराव पाटील हे उमदेवारी अर्ज दाखल करणार आहेत. मतदार गाठीभेटींना जोर आला असून उमेदवारांचे गावभेट दौरे सुरु झाले आहेत. आजी-माजी खासदारांची ही लढत राज्यात लक्षवेधी ठरली आहे. यात कसलेला मल्ल कसे डावपेच टाकतात, यावर विजयाचे गणित अवलंबून आहे. नक्की कोणाचे पारड जड होणार याच्याकडे सर्वांचे लक्ष लागून आहे.

महायुतीचे उमेदवार, माजी खासदार शिवाजीराव आढळराव पाटील हे मोठा जनसंपर्क असल्याने शिरूरचे दोनवेळा खासदार झाले आहेत. डॉ. अमोल कोल्हे हे विद्यमान खासदार असून पाच वर्षातील विकासकामाची मांडणी व मतदारसंघातील न्याय हक्कासाठी आवाज उठविल्याबद्दल त्यांना तीनवेळा संसदरत्न पुरस्कार मिळाला आहे. ही त्यांची जमेची बाजू आहे.



गतवेळी डॉ. अमोल कोल्हे यांनी राष्ट्रवादीकडून निवडणूक लढवली होती. आढळराव यांनी शिवसेनेकडून निवडणूक लढवली होती. मागील दोन वर्षात अनेक राजकीय बदल झाले. पुलाखालून बरेच पाणी वाहून गेले आहे. शिवसेना युतीतून बाहेर पडून महाविकास आघाडी अस्तित्वात आली. शिवसेना पक्षात फूट पडून शिंदे गट बाहेर पडला. राष्ट्रवादीत फूट पडून अजित पवार गट बाहेर पडला. यावेळी लोकसभेची राजकीय गणिते बदलली आहेत.

मागील निवडणुकीत कोल्हे यांच्या प्रचाराची धुरा सांभाळणारे अजित पवार आत्ता आढळरावांचा प्रचार करणार आहेत. आढळराव यांना शिवसेनेकडून निवडून आणणारे उद्धव ठाकरे हे आत्ता अमोल कोल्हे यांना निवडून आणण्यासाठी प्रयत्न करणार आहेत. महायुतीकडे या मतदार संघात ६ पैकी ५ आमदार आहेत तर महाविकास आघाडीकडे १ आमदार आहे. परंतु कोल्हे यांच्या वक्तृत्वावर या भागातील मतदार प्रभावित असल्याचे दिसून येत आहेत. अजित पवार यांच्या राष्ट्रवादीने आयात उमदेवार दिल्याने पक्षीय कार्यकारिणी किती बळ देणार हे पाहणे गरजचे आहे. मैदानात पवारांची जादूची कांडी किती चालते यावर या लोकसभेचे भवितव्य अवलंबून आहे. शिरूर लोकसभेत शरद पवार यांना मानणारा मोठा वर्ग आहे. त्यामुळे शिरूरच्या मैदानात कोण बाजी मारणार, याकडे लक्ष लागले आहे.

आता कोणाच्या मागे किती ताकद लावणार आहेत. यावर चर्चा झडत आहे. शिरूर मतदारसंघात काही छुप्या आणि अंतर्गत खेळी खेळल्या जातील का, यावर विजयाची गणिते अवलंबून आहेत.

### अतीतटीच्या लढतीकडे लक्ष

» बारामती मतदारसंघानंतर पवार कुटुंबीयांसाठी दुसरा महत्त्वाचा मतदारसंघ म्हणजे शिरूर लोकसभा मतदारसंघ आहे. त्यामुळे या लढतीवर सर्वांचे लक्ष लागले आहे. पुणे जिल्ह्यातील जुन्नर, आंबेगाव, खेड-आळंदी, शिरूर, भोसरी, आणि हडपसर या विधानसभा मतदारसंघांचा शिरूर लोकसभा मतदारसंघात समावेश होतो. मतदारसंघाचा बराचसा भाग ग्रामीण असला; तरी खेड, चाकण, भोसरी, रांजणगाव यांसारख्या औद्योगिक क्षेत्रामुळे हा मतदारसंघ आपल्याकडे कसा राहील, यासाठी दोन गटांचा प्रयत्न आहे.

# धानोरीत वीजेचा लपंडाव; दहा तास पुरवठा खंडीत

## वीज नसल्याने सोसायटीमध्ये पाण्याची समस्या निर्माण झाल्याने चाकरमान्यांची धावपळ

**पुणे | प्रतिनिधी**

उन्हाळ्याच्या झळा बसत असताना उकाड्याने हैराण असलेल्या धानोरीकरांच्या त्रासात महावितरणनेही हातभार लावला आहे. मागील तीन ते चार दिवसांपासुन धानोरीतील वीजपुरवठा वारंवार खंडीत होत आहे. महावितरण कंपनीच्या कारभारामुळे धानोरी, मुंजाबावस्ती, गोकुळनगर, आनंदपार्क, भैरवनगर, लोहगाव, पोरवाल रस्ता, साठे वस्तीमधील नागरिकांना त्रास सहन करावा लागत आहे.



वीज पुरवठा वारंवार खंडित होत असल्याने परांडेनगर, धानोरी गावठाण भागातील नागरिकांना बुधवार, गुरुवारची रात्र अंधारात काढावी लागल्याचे सामाजिक कार्यकर्ते सचिन टिंगरे यांनी सांगितले. उन्हाळ्याचे दिवस असल्याने असह्य उकाडा आहे. त्यामुळे विशेषतः रुग्ण, वयोवृद्ध तसेच लहान मुलांचे हाल झाले. वीज नसल्याने सोसायटीमध्ये पाण्याची समस्या निर्माण झाल्याने चाकरमान्यांची धावपळ उडाली. वीज पुरवठ्याबाबत महावितरणच्या कार्यालयात नागरिकांनी संपर्क साधला असता फोन उचलला जात नाही. उचलला तरी काम सुरू आहे, अशी मोघम उत्तरे मिळत असल्याची तक्रार नागरिकांनी केली आहे.

महावितरणकडून विद्युत ग्राहकांना चोविस तास वीज उपलब्ध व्हावी, अशी नागरिकांना अपेक्षा असते. परंतु वेळीअवेळी वीज पुरवठा खंडीत होत असल्याने वीज ग्राहकांचा अपेक्षाभंग होत आहे. याकडे महावितरणच्या अधिकाऱ्यांचे दुर्लक्ष होत आहे, एखाद्या वेळी वीज पुरवठा खंडित झाल्यानंतर अनुचित घटना घडण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे महावितरणने वीज पुरवठा खंडित होणार नाही, याकडे लक्ष द्यावे, अशी मागणी शहरवासीयांकडून होत आहे. पावसाळ्यात अनेकदा वीजपुरवठा खंडित होतो. पुरवठा खंडित होऊ नये यासाठी सुधारणा होणे गरजेचे आहे

### आधुनिक यंत्रणा असताना...

» धानोरीत वीजेचा खेळ चार दिवस सुरू आहे. त्यातच भैरवनगर येथे सकाळी ०९:०० वाजता वीज गेली होती. मात्र, सायंकाळी ०५:०० वाजता अधिकाऱ्यांना फोन करुन माहिती घेतली असता केबल फॉल्ट आहे. दुरुस्तीसाठी आणखी तीन तास लागतील असे उत्तर दिले गेले. त्यामुळे महावितरणकडे विजेची तांत्रिक अडचण तपासणीसाठी आता अत्याधुनिक उपकरणे असतांना देखील १० तास कसे लागतात, असा सवाल सामान्य नागरिक करीत आहे.

> “वीजवहिनी खूप जुनी झाली आहे. उन्हाळ्यामुळे अधिक भार आला, तसेच कडक ऊन असल्यामुळे काही ठिकाणी केबल शॉर्ट होत होती. त्यामुळे गेले तीन चार दिवस वीजपुरवठा सतत खंडित होत होता. आता, संपूर्ण दुरुस्ती करण्यात आली आहे.”.
>
> **- जी. पी. झोपे,**
> कनिष्ठ अभियंता,
> धानोरी विभाग महावितरण.